# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Karanja**

**Date of Good Work done** :- **28/11/2022**

**Brief of the work done :-**

अवैध गुटखा विक्री करणाऱ्यांवर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, कारंजा पथकाची कारवाई ; 7.33 लाखांचा गुटखा जप्त.

## अवैध गुटखा विक्री करणाऱ्या विरुद्ध धडक कारवाई

- ७ लाख ३३ हजारांचा मूद्देमाल जप्त,
- पलाना व दुघोरा येथील कारवाईत तीन आरोपींना अटक तर दोन फरार

देशोन्नती वृत्तसंकलन...

**कारंजा** ▪ समाजात शांतता व सुव्यवस्था राहावी त्याचबरोबर अवैध धंद्यांवर प्रतिबंध व्हावा यासाठी वाशिम जिल्हा पोलीस दलातर्फे सतत कारवाया सुरु आहेत. त्याच पार्श्वभूमीवर वाशिम जिल्ह्यात अवैधरित्या गुटखा विक्री करणाऱ्यांना पायबंध घालण्याकरिता जिल्ह्यात विशेष मोहीम राबविण्यात आली. त्या अनुषंगाने २६ नोव्हेंबर ला उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, कारंजा यांच्या पथकाने कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत महाराष्ट्र शासनाकडून प्रतिबंधित असलेला वेगवेगळ्या कंपनीचा ७ लाख ३३ हजार ३३५ रूपयांचा गुटखा जप्त केला. कारंजा ग्रामीण हद्दीतील पलाना व दुघोरा येथे वेगवेगळ्या ३ ठिकाणी छापा टाकला असता पलाना येथील इब्राहिम किराणा व महेबुब अजिस खान पठाण याचे राहते घरातील छाप्यात ३ आरोपींसह ५९९१८० रुपयांचा मुद्देमाल, तसेच दुघोरा येथे उमेश विष्णुपंत गुल्हाणे यांचे घरातील छाप्यात एका आरोपीसह अंदाजे ७ हजार रुपयांचा मुद्देमाल तर प्रफुल विष्णुपंत गुल्हाणे यांचे घरातील छाप्यात २ आरोपीसह अंदाजे १२७१५५ रुपयांचा मुद्देमाल असे एकूण ५ आरोपींसह अंदाजे ७३३३५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपी महेबुबखान अजिसखान पठाण वय ३३ वर्ष रा. पलाना, उमेश विष्णुपंत गुल्हाणे वय ३८ वर्ष रा. दुघोरा व प्रफुल्ल विष्णुपंत गुल्हाणे वय ३३ वर्ष रा. दुघोरा यांना ताब्यात घेण्यात आलं असून गुन्ह्यातील उर्वरित २ आरोपी फरार आहेत. अटक करण्यात आलेल्या आरोपींवर कारंजा ग्रामीण पो.स्टे. येथे गुन्हे दाखल केले असून पुढील कायदेशीर कारवाई सुरु आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी जगदीश पांडे यांच्यासह उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय कारंजा येथील विनायक देवधर, अमोल कानडे व अनिता गोंधळी यांनी केली. (ता.प्र.)